**प्रेसनोट दिनांक ०४/०८/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**विमानतळ पोलीसांनी मटक्याचे अवैध धंदयावर छापा टाकुन २ इसमांना अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत...**

दिनांक ०१/०८/२०१९ रोजी तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे, पोलीस नाईक ६४०७ राहुल मोरे, पो ना २२६९ संजय आढारी,पो ना २५७६ विष्णु गोणे, पो.ना. १७६२ विशाल गाडे, असे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांचे मुफजल आदेशान्वये अवैध धंदयावर कायदेशीर कारवाई करणेकामी पोलीस ठाणे हददीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांना त्यांचे बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, धानोरी जकात नाका कलवड वस्ती लोहगांव येथे मोकळया जागेत पत्र्याचे शेड मध्ये काही लोक मटका घेत आहे, अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने त्यांनी दोन इसमांना पंच म्हणुन बोलावुन घेवुन त्यांना बातमीचा आशय थोडक्यात कळवुन सदर ठिकाणी जावुन छापा कारवाई करावयाची आहे. असे कळवुन पंचांनी संमती दिल्याने पोलीस उप निरीक्षक पिंगळे, पोलीस नाईक ६४०७ राहुल मोरे, पो ना २२६९ संजय आढारी,पो ना २५७६ विष्णु गोणे, पो.ना. १७६२ विशाल गाडे, यांनी १९/४५ वाजता धानोरी जकात नाका कलवड वस्ती लोहगांव येथे छापा टाकुन इसम नामे १.प्रविण रमेश बायवार वय २७ वर्षे रा. गल्ली नंबर १, हॉटचिप्सच्या बाजुला जकात नाका कलवड वस्ती, लोहगांव पुणे, २. राम शांताराम भोसले वय ५१ वर्षे रा. वडोली भिकेश्वर ता. कराड जिल्हा सातारा यांना किं. रुपये १५७०/- रोख रक्कम व जुगाराच्या राहित्यासह ताब्यात घेवुन पोलीस नाईक ६४०७ राहुल मोरे यांनी त्यांचे विरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम सन १८८७ चे कलम १२(अ) प्रमाणे तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर २९८/२०१९ महाराष्ट्र जुगार अधिनियम सन १८८७ चे कलम १२(अ) दाखल करण्यात आलेला असुन त्यांचेकडुन पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी त्यांना दिनांक १/८/२०१९ रोजी १/१५ वाजता अटक करुन त्यांचे १५७०/- रोख रक्कम व जुगाराचे साहीत्य पंचनाम्याने जप्त केलेले आहे. तसेच पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे व वरील नमुद कर्मचारी यांनी उत्कष्ठ कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**